राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे
महाराष्ट्र राज्य

| | | |
|---|---|---|
| अतिरिक्त संचालक दूरध्वनी क्रमांक (वै) -<br>कार्यालय दूरध्वनी क्र. - | २६०५८९९६ (वै)<br>२६०५८७३९ (का)<br>२६०५८१३९ (का)<br>२६०५८४७६ (का) | अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटूंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, कुटूंब कल्याण भवन, राजाबहादूर मिलरोड, रेल्वेस्टेशनच्या मागे, पुणे ४११ ००१. Email ID: spm.pune1@gmail.com |
| **आरोग्य सेवा** | | जा.क्र.राकुकका/बाल आरोग्य/कक्ष १५क/NSS विशेष शिबिर आयोजन/53378-450/२०२४ दिनांक:25/11/२०२४ |


प्रति,

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद.............. सर्व
जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय.......... सर्व

**विषयः राष्ट्रीय सेवा योजनाअंतर्गत अंतर्गत शिबिरांमध्ये किशोरवयीन मुला मुलींची रक्तक्षय तपासणी करणेबाबत**

**संदर्भः** उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुबई यांचे जाक रासेया-२०२४/प्र.क्र.७४/ररोयो कक्ष/ दिनांक २८ ऑक्टोबर २०२४ रोजीचे पत्र

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये राष्ट्रीय सेवा योजना संलग्नित विद्यापीठ/संचालनालय अंतर्गत प्रत्येक महाविद्यालयातर्फे वर्षातून एकदा सात दिवसांचे निवासी विशेष शिवीर महाविद्यालयीन दत्तक घेतलेल्या गावी नोव्हेंबर ते जानेवारी या हिवाळा ऋतू मध्ये आयोजित करण्यात येते. दरवर्षीप्रमाणे सन २०२४-२०२५ मधील राष्ट्रीय सेवा योजनाअंतर्गत वार्षिक सात दिवसीय विशेष शिबिरांचे आयोजन दि. ०१/११/२०२४ ते ३१/०१/२०२५ या कालावधीत करण्यात येणार आहे.

या वार्षिक सात दिवसीय विशेष शिबिरांमध्ये शिबिरातील सहभागी युवकांची तसेच गावातील किशोरवयीन मुला- मुलीची अनेमिया (रक्तक्षय) बावत तपासणी करणे हा विशेष कृती कार्यक्रम राबवण्यात येणार आहेत. या संदर्भात शिबीर समन्वयक यांच्याकडून प्राप्त होणा-या विनंती अर्जानुसार शिबीरातील सहभागी विदयार्थी तसेच शिबीर आयोजित गावातील किशोरवयीन मुला-मुलींचे अनेमिया (रक्तक्षय) तपासणी ॲनिमीया मुक्त भारत कार्यक्रमातील मार्गदर्शक सुचना नुसार त्या कार्यक्षेत्रातील वैद्यकीय अधिकारी यांच्या मार्फत अनेनिया (रक्तक्षय) तपासणी व उपचार करण्यात यावी.

याकरीता आपल्या अधिनस्थ वैदयकिय अधिकारी/ वैदयकिय अधिक्षक (आ.आ. केंद्र/ग्रारु/उपजिल्हा रुग्णालय/जिल्हा रुग्णालय) यांना आपल्या स्तरावरुन आदेशीत करण्यात यावे तसेच केलेल्या स्क्रीनिगचा अहवाल या कार्यालयास पाठविण्यात यावा

सोबत जिल्हा निहाय राष्ट्रीय सेवा योजना शिबीर समन्वयकांची नावे व संपर्क क्रमांक देण्यात आलेले आहेत.

(डॉ. बबीता कमलापुरकर)
**अतिरीक्त संचालक, आरोग्य सेवा,**
**कुटुंब कल्याण माताबाल संगोपन व शालेय आरोग्य पुणे**

**प्रत माहितीस्तव**
राज्य संपर्क अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

**प्रत सविनय सादर -**

१) मा. अपर मुख्य सचिव, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२) मा. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३) मा. संचालक आरोग्य सेवा,आयुक्तालय, पुणे.

Scanned with OKEN Scanner